# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

नोंदणी क्रमांक पी.एन./३९७८/दिनांक ६/२/२००९ संलग्न भारतीय मजदूर संघ

विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०

महानिर्मिती महाराष्ट्र राज्यविद्युत निर्मिती कंपनी मर्यादित | महा पारेषण महाराष्ट्र राज्यविद्युत पारेषण कंपनी मर्यादित | महा वितरण महाराष्ट्र राज्यविद्युत वितरण कंपनी मर्यादित

www.mvkksangh.com

# कामगार संदेश

mvkksangh@gmail.com

वर्ष : १ ले परिपत्रक क्र. : १ दि. २३ जुलै २०२३


## कामगार संदेश प्रकाशन सोहळा पुण्यात संपन्न

पुणे : वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांसाठी वीज उद्योगात झालेल्या घडामोडींची माहिती व्हावी या साठी भारतीय मजदूर संघाचा वर्धापन दिना निमित्त दर महिन्याला एक कामगार संदेश माहितीपत्र महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने प्रसिध्द करण्यात येणार आहे. या कामगार संदेश माहिती पत्राचे प्रकाशन मा. श्री. बाळासाहेब फडणवीस, मा. अध्यक्ष, भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला प्रमखु उपस्थिती मा.श्री. ॲड. अनिल ढुमणे, अध्यक्ष भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश, मा.श्री. उदयराव पटवर्धन मा. महामंत्री, भारतीय मजदूर संघ, मा.श्री. मोहन येणुरे, प्रदेश महामंत्री भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश तसेच महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.



## मार्क नको, सामावून घ्या, कार्यरत कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित रोजगार द्या : निलेश खरात

मुंबई : महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील नियमित रिक्त पदांच्या जागेवर व कामाच्या गरजेनुसार काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना नियमित भरती करताना ओरिसा राजस्थान पंजाब या सरकार प्रमाणेच प्राधान्याने सामावून घेऊन कायम करण्यात यावे घ्यावे अथवा पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र

(पान६वर)

## वीज कंत्राटी कामगारांच्या मागण्याबाबत बैठक घेणार : ऊर्जा सचिव



मंत्रालय : सोमवार दि. २६ जून २०२३ रोजी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या शिष्ट मंडळाच्या वतीने राज्याच्या प्रधान सचिव ऊर्जा मा.श्रीमती आभा शुक्ला मॅडम यांची भेट घेतली. तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगारांना भेडसावत असलेल्या समस्यां त्यांना सांगितल्या. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघा सोबत मिटिंग घेतली जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, महामंत्री सचिन मेंगाळे व संघटनमंत्री उमेश आनेराव उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री फडणवीस यांना संघटनेचे निवेदन व अंगणवाडी सेविकांकडून सत्कार.



मुंबई : राज्यातील अंगणवाडी सेविकांना महाराष्ट्र शासनाने नुकतीच पगारवाढ लागू केली त्यामुळे भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने सोमवर दिनांक २६ जून २०२३ रोजी मंत्रालयात जाऊन राज्याचे महिला व बाल कल्याण मंत्री मा.ना.मंगलप्रभातजी लोढा साहेब यांच्या उपस्थितीत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचे आभार मानले. यावेळी अंगणवाडी प्रदेश अध्यक्षा सुरेखा गायकवाड, तासगाव तालुका अध्यक्षा शाकीरा इब्राहिम सय्यद, लतिका पाटील पदाधिकारी आणि महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात, महामंत्री सचिन मेंगाळे, संघटन मंत्री उमेश आनेराव उपस्थित होते.

# नवीन पिढी, नव्या संकल्पना : अण्णाजी देसाई




मुंबई : महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ स्थापनेपासूनच वीज कंत्राटी कामगारांच्या हिताचे काम करत आहे. २००९ साली या संघटनेची नोंदणी झाली त्यापूर्वी प्रस्थापित असलेल्या सर्व संघटनांना संघटना काय असते ? ती कशी चालवली जाते ? कंत्राटी कामगारांचे प्रश्न कायदेशीर मार्गाने कसे सोडवायचे ? याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ . एक कंत्राटी कामगारच दुसऱ्या कंत्राटी कामगारांची व्यथा जाणू शकतो हे लक्षात घेऊन भारतीय मजदूर संघाने कंत्राटी कामगारांनी कंत्राटी कामगारांसाठी चालवलेले संघटन स्थापन केले. देशातील बलाढ्य अशा भारतीय मजदूर संघ व व वीज उद्योगातील राज्यात बलाढ्य अशा वीज कामगार महासंघाने यथायोग्य सहकार्य केले त्यामुळे २००९ साली लावलेल्या बीजाचे आज मोठ्या वृक्षात रूपांतर झाले असून महावितरण महापारेषण महानिर्मिती कंपनीतील सर्व कंत्राटी कामगारांपर्यंत संघटना पोहोचली आहे. अनेक लाभ संघटनेने मिळवून दिले आहेत आणि त्याच मुळे कंत्राटी कामगार संघावर कामगारांनी पूर्ण विश्वास ठेवला. कंत्राटी कामगार संघाचे पदाधिकारी दिवस-रात्र केवळ आणि केवळ राज्यातील कंत्राटी कामगारांसाठीच प्रयत्नशील असतात. सातत्याने पुणे मुंबई नागपूर इतर जिल्ह्यांमध्ये सतत दौरे प्रवास मेळावे ,भविष्य निर्वाह निधी कार्यालय, कामगार आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, सर्व कंपन्यांचे हेड ऑफिस या ठिकाणी सातत्याने गाठीभेटी पत्रव्यवहार करून कंत्राटी कामगारांच्या हितार्थ जसे काम अपेक्षित आहे तशा पद्धतीने या संघटनेचे सर्व स्तरावरील पदाधिकारी उत्तम काम करत आहेत. त्यांचे हे कार्य जगासमोर यावे याकरिता एक संकल्पना मी त्यांना दिली व त्यांनी लगेच कामगार संदेश या माध्यमातून सर्व कामगारांना आज उपलब्ध करून दिली. नवीन युगाप्रमाणे नवीन टेक्नॉलॉजीचा वापर डिजिटल इंडिया चा प्रभावी वापर ही संघटना करत आहे आज कंत्राटी कामगारांची देशात अशी कुठेच संघटना नाही संघटनेच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.



# सरकारने कंत्राटदार हटवून कामगारांना न्याय द्यावा : भारतीय मजदुर संघ

४ जुलै : केंद्र सरकारच्या कामगार,वस्त्र ऊद्योग व स्कीील्ड डेव्हमेंट या विषया करिता पार्लमेंटरी कमिटीचा अध्ययन दौरा दिनांक ४ जुलै २०२३ रोजी पुणे येथे होता.सदरील अभ्यास दौरा मध्ये कंत्राटी कामगारांच्या विविध समस्या व कामाची स्थिती, सोई सुविधा, सामाजिक सुरक्षा बाबतीत माहिती कमिटी ने माहिती घेतली,असंघीटत व कंत्राटी क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर प्रामुख्याने अभ्यास करण्यात आला. कंत्राटी व असंघटित कामगारांच्या समस्यां समजून घेऊन त्यात देशपातळीवर बदल करण्या करिता सूचना मागवून केंद्र सरकारला या कमिटी कडून शिफारसी केल्या जातात.राज्यातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील सर्वच उद्योगात कार्यरत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदार मुक्त केल्यास शासनाकडून मिळणारे सर्व लाभ १००% कामगाराला मिळून कामगारांच्या जीवनात स्थैर्य येईल अशी बाजू महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे महामंत्री मा.सचिन मेंगाळे यांनी कमेटी समोर मांडलीकेवळ कंत्राटी कामगार कायम होऊ नये या साठीच आस्थापना मार्फत नामधारी कंत्राटदारांची नेमणूक केली जाते. या कंत्राटदारां कडून मिळणारा रोजगार हा शाश्वत नसतो. कंत्राटदार व संबंधित प्रशासकीय अधिकारी संगनमताने या देशातील विविध आस्थापनातील कंत्राटी कामगारांचे विविध प्रकारे युक्त्या करून आर्थिक,मानसिक व सामाजिक शोषण करतात व यामुळे लाखो कंत्राटी कामगारांची राज्य व केंद्र शासना विरोधी नाराजी वाढते. या साठी हरियाणा सरकार ने स्थापन केलेल्या कौशल्य विकास बोर्ड सारखे बोर्ड ( महामंडळ ) हे इतर राज्यात सुरू झाल्यास आज रोजी असंलेले सर्व कामगार यांना आहे तसे त्यात सामावून घेऊन कंत्राटदार विरहित रोजगार देशभरात चालू झाल्यास देशातील सर्व उद्योगातील कंत्राटी कामगाराला त्याच्या श्रमाचे पूर्ण मूल्य त्याच्या बँक खात्यात मिळेल व त्याला त्याच्या वयाच्या ६० वर्षा पर्यंत जॉब सिक्युरिटी म्हणजेच शाश्वत रोजगार मिळेल या साठी या पार्लमेंटरी कमेटी ने केंद्र सरकार ला शिफारस करावी असा प्रस्ताव वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात यांनी मांडलाया मिटिंग साठी भारतीय मजदूर संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष मा.अर्जुन चव्हाण, सचिव मा.बाळासाहेब भुजबळ, अखिल भारतीय बिडी मजदूर संघाचे सचिव ॲड.उमेश विश्वाद, बांधकाम मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री संजय सुरवसे, वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात, महामंत्री सचिन मेंगाळे, संघटन मंत्री उमेश आनेराव, कोषाध्यक्ष सागर पवार व अन्य अनेक उद्योगाचे पदाधिकारी उपस्थित होते या पार्लमेंटरी कमिटी ( लेबर ) चे चेअरमन मा.भ्रतृहरि महताब यांना शिष्ट मंडळातर्फे पुष्पगुच्छ व विविध उद्योगांच्या विविध मागण्यांची निवेदने देण्यात आली.

# प्रेरणास्थान



**श्रध्देय स्व. दत्तोपंत ठेंगडी**

संस्थापक
भारतीय मजदुर संघ

| | | |
|---|---|---|
| नाव | : | दत्तोपंत बाबुराव ठेंगडी |
| जन्म दिनांक | : | १० नोव्हेंबर १९२० |
| जन्म ठिकाण | : | आर्वी, वर्धा महाराष्ट्र |
| शिक्षण | : | एम.ए. एल.एल.बी |
| वडिलांचे नाव | : | बापूराव दाजीबा ठेंगडी |
| आईचे नाव | | श्रीम. जानकीदेवी बापुराव ठेंगडी |
| महत् कार्य | : | संस्थापक स्वदेशी जागरण मंच |
| | | भारतीय किसान संघ |
| | | भारतीय मजदुर संघ |
| संस्थापक | : | सामाजिक समरसता संघ |
| | | सर्व पंथ समादर मंच |
| | | स्वदेशी जागरण मंच- पर्यावरण |
| | | अखिल भारतीय अधिवक्ता परिषद |
| | | भारतीय विचार केंद्र |
| | | अखिल भारतीय ग्रहक पंचायत |
| पुस्तक लेखन | : | एकात्म मानव दर्शनविचार सुत्र |
| | | डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्ष और कार्य |
| | | राष्ट्रीय श्रमदिवस |
| | | छत्रपती शिवाजी महाराज इतर अनेक पुस्तके |
| प्रमुख भाषण | : | द वर्थ डे - विश्वहिंदू संमेलन |
| | | डर्बन बिजींग रेडीओ द्वारे भाषण प्रसारण |
| | | २८/०८/१९८५ |
| देहवसन | : | १४ ऑक्टोबर २००४ पुणे |

# वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांच्या करिता स्वःतंत्र शेड्युल नुसार सुधारित वेतन दर लागु करावे : महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांची मागणी

महाराष्ट्र राज्यात कामगारांच्या करिता ६५ पेक्षा जास्त विविध शेड्युल नुसार किमान वेतन दर निश्चीत केले जातात. या मध्ये दर पाच वर्षांनी तत्कालीन महागाई,जीवनावश्यक वस्तूंच्या किमती ई आधारावर किमान वेतन दर मध्ये सुधारणा करावेत असा किमान वेतन कायद्यानुसार लागु करणे बंधनकारक आहे. पण महाराष्ट्रातील १५ ऊद्योगातील किमान वेतन दर मुदत संपुनही ७/८ वर्ष सुधारित वेतन दर अद्याप पर्यंत लागु केले नाहीत. त्यामुळे विविध शेड्युल उद्योगातील हजारो कामगार सुधारित वेतन दरा पासून वंचित आहेत. शासनाकडून किमान वेतन सुधारणा वेळेवर न झाल्याने कामगारांची मोठ्या प्रमाणात आर्थिक कुचंबणा होते. सध्या मिळणारे उत्पन्नात किमान गरजाही पुर्ण करणे जिकिरीचे झाले आहे. त्यामुळे प्रलंबित सुधारित वेतन दर फरका सहित देण्यासाठी मागणी ठेकेदार कामगार संघ, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ ) ने महाराष्ट्रातील लाखो कंत्राटी कामगारांच्या वतीने मा कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य मा.श्री सतीश देशमुख यांना संघटनेच्या पदाधिकारी यांनी कामगार आयुक्त कार्यालय बांद्रा मुंबई येथे देवून कामगारांच्या विविध व्यथा मांडल्या आहे.




त्यांच प्रमाणे वीज ऊद्योगातील कंपनी मध्ये सुमारे ४० हजार पेक्षा जास्त कामगार कंत्राटी पध्दतीने कायम कामगारांच्या सोबत कार्यरत आहेत. महानिर्मीती मधील कंत्राटी कामगारांना फॅक्टरी अंडर फॅंक्टरी अॅंक्ट १९४७ नुसार व महापारेपण व महावितरण मधील कंत्राटी कामगारांना शॉप अॅंक्टनुसार किमान वेतन दिले जाते. विद्युत क्षेत्रातील कामगारांना करावी लागणारी कामे, धोक्याची शक्यता, काम करताना लागणारे विशेष झोन,कुशलता, कौशल्य,अपघाताचे प्रमाण,उच्च विद्युत भार,धोकादायक ऊद्योग असल्यामुळे या कामगारांना स्वतंत्र शेड्युल नुसार वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांच्यां करिता स्वतंत्र नवीन शेड्युल् निर्माण करून कामगारांना त्यानुसार सुधारित वेतन दर, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, धोकादायक ऊद्योगातील भत्ता नुसार किमान वेतन दर निश्चीत करून कामगारांना लाभ देण्यात यावेत. व सध्या चालू असलेल्या किमान वेतन अधिसूचना दरांची मुदत संपण्यापुर्वी घोषणा करावी तसेच या विषयावर महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा आयोजित करावी अशी मागणी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या व ठेकेदार कामगार संघाच्या (संलग्न भारतीय मजदूर संघ) वतीने मा.श्री.सतीश देशमुख कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना निवेदना व्दारे दिली आहे. या वेळी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) चे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, कार्याध्यक्ष अमर लोहार उपमहामंत्री राहूल बोडके व कोषाध्यक्ष सागर पवार उपस्थित होते.

## वेलू गगनावरी

सर्व उद्योगांची जननी वीज
सापडली खाजगीकरण विळख्यात
आस्मानी सुलतानी संकटे घातक
उजाडता नव युगाब्धातील पहिले शतक.
आतबट्ट्याचा एन्रॉन करार
त्या वरकडी बोकळता भ्रष्टाचार
कोलदांडा शून्याधारित अर्थसंकल्प
निस्तरण्या विकल्प खातेबाह्य अधिकारी.
साधनसामुग्री यंत्रणा जुनी पुराणी
खाजगी उद्योगपतींशी स्पर्धा जीवघेणी
निवृत्तीकारणे कामगार संख्या अपुरी
नवचैतन्या नाकारी भरती बंदी.
भरीस भर वीज मंडळ त्रिभाजन
निकोप स्पर्धेनावे कंपनीकरण
एकसंध उद्योगाचे विलगीकरण
कारण सामूहिक शक्तीपाताचे.
होय दमछाक विद्युतीकरण वेग राखता
वाढत्या ग्राहक संख्येस गवसणी घालता
मेटाकुटीस कामगार जनक्षोभ आवरता
उताऱ्यास तोडगा अनिर्बंध कंत्राटीकरण.
एका कामगारास अनेक मालक
कामाच्या तुलनेत वेतन माफक
विपरीत परिस्थितीत धैर्य अलौकिक
एकवटली कंत्राटी कामगार शक्ती.
कंत्राटी कामगार हरहुन्नरी कष्टाळू
ठोठावती दारे हुडकण्या न्यायदाते कनवाळू
त्याग तपस्या बलिदानाचा करुनी निर्धारु
भगवा ध्वज खंबीर पाठराखा.
पुण्यनगरीच्या वारजे उपनगरात
बीज पेरले ओसाड माळरानात
थंडी वारा उन्ह पाऊस झेलत
कंत्राटी कामगार संघाची गगनभरारी..॥..

शरद संत, पुणे.
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ
भारतीय मजदुर संघाच्या वर्धापन दिनानिमित्त सादर
दि.२३-०७-२०२३.

(पान १ वरुन)

राज्य विद्युत मंडळ असताना ज्या रोजंदारी कामगार पद्धतीने कामगारांना कंत्राटदार विरहित व शाश्वत रोजगार दिला गेला त्या प्रमाणेच रानडे समितीचे अहवाला नुसार महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील नियमित रिक्त पदांच्या जागेवर व कामाच्या गरजेनुसार आज रोजी तिन्ही कंपनीत काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना वयाच्या ६० वर्षा पर्यंत शाश्वत रोजगार देण्यात यावा.



## भावपूर्ण श्रध्दांजली

जनतेला अखंडित वीज सेवा देताना शहीद झालेले वीज कंत्राटी कामगार यांना भावपुर्ण श्रद्धांजली

कै. सुनील पाटील, पालघर
कै. सतीश तोडासे, चंद्रपूर
कै. निलेश होनराव, सोलापूर
कै. अजय घोडके ,अहमदनगर
कै. राधाकिसन आहेर, अहमदनगर
कै. अमित माने, कोल्हापूर
कै. अरविंद वर्मा, नागपूर
कै. यशवंत राऊत, अकोला



# कामगार विषयी शासकीय समित्यांचे त्वरित गठीत करून कामगारांना न्याय द्यावा : भारतीय मजदूर संघांची मागणी

महाराष्ट्र राज्यातील कामगारांच्या कल्याणकारी योजना व विविध कामगार कायद्यांच्या प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्रिस्तरीय समिती व महामंडळाची कायद्यात तरतूदी असताना ही गेल्या तीन वर्षापासून सदरील समितीची अशासकीय पदे रिक्त असल्याने त्वरित भरून कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा च्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार यांना मा.जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या मार्फत भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा शिष्टमंडळाने अशी मागणी केली आहे .

महाराष्ट्र शासनाच्या कामगार मंत्रालयाच्या विविध विषयांवर समिती चे कामकाज चालते या मध्ये प्रामुख्याने घरेलु कामगार मंडळ, बांधकाम कामगार कल्याण मंडळ, असंघीटत कामगार कल्याण मंडळ, किमान वेतन सल्लागार समिती, कंत्राटी कामगार निर्मूलन समिती, भविष्य निर्वाह निधी रिजनल कमिटी, ई ऐस आय रिजनल कमिटी, सुरक्षा रक्षक बोर्ड, माथाडी कामगार कल्याण मंडळ, कामगार कल्याण मंडळ आदी मंडळा मार्फत कामगार कायद्यातील तरतूदी ची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. सदरील समिती मध्ये व्यवस्थापन प्रतिनिधी, कामगार संघटना प्रतिनिधी,व शासकीय अधिकारी यांच्या माध्यमातून कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मागील ३/४ वर्षापासून समिती चे पुन:र्गठन न झाल्याने महाराष्ट्र राज्यातील लाखो कामगार शासकीय योजनेच्या लाभां पासून वंचित आहेत.

किमान वेतन कायद्यानुसार ५ वर्ष पुर्वी किमान वेतन वाढविण्यासाठी कायद्यात तरतूदी आहे. पण शासन स्तरावर अनेक ऊद्योगातील किमान वेतन दरां मधे सुधारणा झालेली नाही.

त्यामुळे कामगारांना या योजनेचे लाभांकरिता समिती चे पुन:गठन करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

मा जिल्हाधिकारी कार्यालय पुणे च्या वतीने श्री धनंजय जाधव तहसीलदार गृह यांनी निवेदन स्विकारले या वेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सेक्रेटरी बाळासाहेब भुजबळ,अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे महामंत्री सचिन मेंगाळे, असंघीटत क्षेत्रातील कामगार पदाधिकारी उमेश विश्वाद, महिला प्रमुख वंदना कामठे, ॲड. संध्या खरे, गणेश टिंगरे, ज्ञानेश्वर जाधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ वेलफेअर फंड

महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगार बंधू आणि भगिनी यांना सप्रेम नमस्कार. आपण वीजेसारख्या धोकादायक उद्योगांमध्ये काम करत असतो म्हणजेच आपण आपला जीव सतत धोक्यात घालूनच काम करतो. आपण शासनासाठी व नियमित रिक्त पदावर व किमान वेतनावर काम करत असल्याने आपल्यावर व आपल्या कुटुंबियांवर वैद्यकीय उपचार करणे आपल्याला आर्थिक रीत्या अवघड होते. तसेच आपला अचानक अपघाती मृत्यू झाल्यास आपल्याला शासनाच्या वतीने कोणतीही आर्थिक मदत मिळत नाही ही शोकांतिका आहे. त्यामुळे आपल्या पश्चात आपल्या कुटुंबाची काळजी आपल्यालाच घेणे गरजेचे असल्यामुळे आपल्याला वेलफेअर फंडाचा थोडा का होईना पण नक्कीच आधार मिळू शकतो मात्र या साठी आपल्याला महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ वेलफेअर फंडाचे सभासद होणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ वेलफेअर फंडाची नियमावली

१ ) वेलफेअर फंडाचे सभासद होण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे सदस्य असणे आहे

२ ) महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे सदस्य नोंदणी ही www.mvkksangh.com या संघटनेच्या वेबसाईटवर करता येईल.

३ ) महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ वेलफेअर फंडाचे सदस्य नोंदणी ही सुद्धा संघटनेच्या www.mvkksangh.com या संघटनेच्या वेबसाईटवर करता येईल.

४ ) महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे सदस्यत्व व वेलफेअर फंडाचे सदस्यत्व हे दर वर्षाच्या १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंत राहील.

५ ) वेलफेअर फंडाचे सभासद होण्यासाठी १०० रुपये वार्षिक वर्गणी असेल

६ ) वेलफेअर फंड सदस्याचा दुर्दैवाने कुठेही अपघात झाला व त्याला अपघातास ५०,००० चे वर वैद्यकीय खर्च आला तर त्या सभासदास चेक द्वारे ५००० रुपये देण्यात येतील.

७ ) वेलफेअर फंड सदस्याचा कुठेही अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना रुपये ११,००० मदत निधी चेक द्वारे दिला जाईल.

---

वीज कंत्राटी कामगार त्यांचा जन्मदिवस त्यांच्या कुटुंबातील प्रिय व्यक्तींचा जन्मदिवस, इतर शुभ कार्य विविध पद्धतीने साजरा करतात. काही व्यक्ती समाजाचे आपण देणे लागतो या जाणिवेतून वायफळ खर्च टाळून समाजा साठी काही रक्कम खर्च करतात. प्रत्येक कंत्राटी कामगाराने शक्य झाले तर आपल्याच वीज कामगार बाधवांच्या हितार्थ स्थापन केलेल्या महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वेल्फेअर फंडास सेवच्छेने व आपल्या कुवतीनुसार ( १०० / २०० / ५०० ) निधी देऊ शकतो. या जमा झालेल्या निधीतुनच आपण आपल्याच संघटनेच्या अपघात ग्रस्त सदस्य कंत्राटी कामगार किंवा आपल्याच मृत सदस्य कामगारांच्या कुटुंबाला हा निधी चेक द्वारे पोहचवतो. तरी आपण सर्वांनी याची नोंद घ्यावी.हा स्वेच्छा निधी खालील बँक डिटेल्स चा वापर करून गुगल पे अथवा फोन पे च्या माध्यमातून ऑनलाईन भरू शकतो.

बँक खाते नाव :

**महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ वेलफेअर फंड**
**स्टेट बँक ऑफ इंडिया**

**BRANCH AMBEGAON PUNE**
A/c no 39435068241
Ifs code SBIN0011648

---

**"कामगार संदेश"** मध्ये आपल्या जिल्ह्यातील झालेल्या कार्यक्रम विविध घटना त्यांचे फोटो याबाबतची माहिती kamgarsandesh@gmail.com या मेल आयडीवर पाठवावी त्यात उपस्थित यांची नावे तारीख असावी.

# माझी संघटना माझा अभिमान

## मर्म भेद

आज २३ जुलै भारतीय मजदूर संघाचा ६८ वा वर्धापन दिवस. देशातील प्रथम क्रमांकाच्या बलाढ्य संघटनेशी संलग्न असलेली आपली महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ ही राज्यातील सर्व अर्थाने प्रथम क्रमांकाची संघटना. राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपणीत नियमित रिक्त पदांच्या जागेवर काम करत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना न्याय मिळावा या साठी भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वात महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने आज पर्यंत खूप काम व सतत विविध प्रयत्न केले आहेत त्यावर थोडा प्रकाश टाकत आहोत.

राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपणीत नियमित रिक्त पदांच्या जागेवर काम करत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांसाठी ६ फेब्रुवारी २००९ साली नोंदणी केली. वीज कामगार महासंघ व त्याचे सर्व पदाधिकारी यांचा भक्कम पाठिंबा व या कामगारांना न्याय देण्याची वृत्ती व विचार या माध्यमातून कामगार महासंघाने पालकत्वाची भूमिका घेतली. त्यांच्या सहकार्य व मार्गदर्शनामुळे राज्यभरात संघटना विस्तार व वाढ झाली.

अगदी सुरुवाती पासून नाही पण अलीकडील काळातल्या काही मुख्य घटना आपण पाहू की जेणे करून कामगार एक संघ झाले तर काय लाभ आपल्याला मिळाले व पुढील काळात आपण काय मिळवू शकतो

२३ जुलै २०१९ रोजी पर्यंत आपले किमान वेतन ९ वर्षे रखडले होते. २३ जुलै २०२३ रोजी तत्कालीन कामगार मंत्री मा. संजयजी कुटे यांची संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी यांनी भेट घेऊन संघटनेच्या मोबाईल ॲप चे उदघाटन केले होते. याच दिवशी रखडलेल्या किमान वेतन वाढी बाबत मंत्रालायत संघटनेची मिटिंग झाली.व लगेच दुसऱ्याच दिवशी म्हणजे २४ जुलै २०१९ पासून आपल्याला ९ वर्षे रखडलेली किमान वेतन वाढ लागू करून घेतली हे कामगारांनी विसरू नये. हे काम काही एका दिवसात झाले नाही तर या साठी किमान वेतन कमिटी मध्ये भारतीय मजदूर संघाचे ३ सदस्य कार्यरत होते, संघटनेचा पाठपुरावा तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातील हजारो कंत्राटी कामगारांनी यासाठी पुणे ते मुंबई पायी मोर्चा देखील काढला तसेच २७ जून २०१९ रोजी मुंबईत आझाद मैदान येथे भर पावसात भव्य आंदोलन देखील केले. हे सर्व राज्यातील कंत्राटी कामगारांच्या सहकार्यामुळे आपल्याला शक्य झाले

किमान वेतन वाढ झाल्यावर आपण थांबलो नाहींतर या किमान वेतनाच्या बेसिक वर तब्बल २०% वेतन वाढीचा लाभ आपण मिळवून घेतला जो आज पर्यंत प्रथमच राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांना कंपनी कडून केवळ आणि केवळ वीज कामगार महासंघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे प्रयत्नांमुळे. जे आज पर्यंत कोणत्याही प्रस्थापित संघटनेला शक्य नव्हते ते आपण सर्वांच्या ताकतीने करून दाखवले. कामगार महासंघाने मागणी पत्र दाखल केले व ही वाढ मिळवून देण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला

राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपणीत काम करत असलेल्या प्रत्येक कंत्राटी कामगाराला किमान वेतन वाढीचा व २० % वेतन वाढीचा ( पूरक भत्ता ) लाभ हा केवळ आणि केवळ भारतीय मजदूर संघ, वीज कामगार महासंघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ यांच्या प्रयत्नांमुळे झाला हे मान्य करावेच लागेल व राज्यातील कोणत्याच कामगारांनी कधीच विसरू नये

दरवर्षी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ राज्याचे कामगार आयुक्त व तिन्ही वीज कंपनी व्यवस्थापनाकडे पाठपुरावा करतो यामुळे अनेकांना न मिळणारा बोनस मिळू लागला आहे

कंत्राटदारांच्या जाचामुळे राज्यातील अनेक कंत्राटी कामगारांचे रोजगार गेले होते, कामगार आयुक्त कार्यालय, कंपनी व्यवस्थापन व तत्कालीन ऊर्जामंत्री यांच्या कडे वेळोवेळी पाठपुरावा करून संघटनेने हजारो कामगारांना त्यांचे गेलेले रोजगार परत मिळवून दिले ही मोठी उपलब्धी संघटनेची आहे

वीज कामगार महासंघ व कंत्राटी कामगार संघाच्या प्रचंड दबाव व प्रयत्ना मुळे हजारो कंत्राटी कामगारांच्या बदल्या

थांबल्या या साठी मा. खासदार सुप्रियाताई सुळे व उर्जाराज्य मंत्री मा.प्राजक्त दादा तनपुरे यांची मोलाची मदत झाली.

संघटनेने राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांच्या करिता वेल्फेअर फंड स्थापन केला आहे

संघटनेने राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांच्या करिता वेबसाईट तयार केली आहे

संघटनेने राज्यातील महावितरण महा पारेषण व महा निर्मिती कंपनीतील कंत्राटी कामगारां करिता ३ कंपन्या निहाय ३ स्वतंत्र मोबाईल अँप डिझाइन केले आहेत

या माध्यमातून कामगारांची सर्व माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचा प्रयत्न केला आहे

वेबसाईट च्या माध्यमातून सर्व प्रकारची फी ही ऑनलाईन केल्याने आर्थिक पारदर्शकता आणली आहे

संघटनेने २०१२ पासून केलेल्या विविध कोर्ट केस मुळे आज राज्यातील ७७१४ कंत्राटी कामगारांना जॉब सिक्युरिटी मिळाली आहे अर्थात काही यातील साधारण ९० ते १०० कामगार प्रशासकीय आडमुठ्या धोरणामुळे आज घरी आहेत लवकरच ते कामावर येतील यात शंका नाही संघटना त्या साठी प्रयत्नशील आहे.

पुढील किमान वेतन वाढीचा प्रस्ताव देखील संघटनेने राज्याच्या कामगार आयुक्त यांना मुदतीपूर्वी दिला आहे

राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांना २०१९ पेक्षा या वेळी जास्त पगार वाढ मिळावी यासाठी वीज कामगार महासंघाने पाऊल उचलले असून त्यांच्या मागणी पत्रात सर्व कंत्राटी कामगारांना भरगोस पगार वाढ मिळावी यासाठी पालक संघटना प्रयत्नशील आहे

किमान वेतन वाढीचा प्रस्ताव देतानाच वीज उद्योग हा धोकादायक उद्योग असल्याने त्याला नवीन शेड्युल जाहीर करून किमान वेतनाच्या माध्यमातून आपल्या पगार वाढीची तरतूद करण्याचा प्रस्ताव देखील संघटनेने राज्याच्या कामगार आयुक्त यांना दिला आहे.

संकट काळात आर्थिक मदत व्हावी या साठी संघटनेच्या सदस्या साठीच वेल्फेअर फंड स्थापन केला आहे

कोरोना काळातसंघटनेच्या सदस्यांची व कुटुंबाची काळजी घेण्यासाठीच साठीच १0 लाखाची विमा योजना सुरू केली होती

आज देखील **HDFC** बँकेच्या माध्यमातून हजारो वीज कंत्राटी कामगारांना ११ लाखाचा विमा वेतन खाते माध्यमातून दिला आहे

पुढील काळात महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील नियमित रिक्त पदांच्या जागेवर व कामाच्या गरजेनुसार काम करत मागील १५ ते २० वर्षे नियमित काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना नियमित भरती करताना ओरिसा राजस्थान पंजाब या सरकार प्रमाणेच प्राधान्याने सामावून घेऊन कायम करण्यात यावे घ्यावे अथवा पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ असताना ज्या ( NMR ) रोजंदारी कामगार पद्धतीने कामगारांना कंत्राटदार विरहित व शाश्वत रोजगार दिला गेला त्या प्रमाणेच रानडे समितीचे अहवाला नुसार महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील नियमित रिक्त पदांच्या जागेवर व कामाच्या गरजेनुसार आज रोजी तिन्ही कंपनीत काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित वयाच्या ६0 वर्षा पर्यंत शाश्वत रोजगार देण्यात यावा या मागण्याचा पाठपुराव संघटना करत आहे गरज आहे ते सर्वांच्या सहकार्याची

असे अनेक लाभ हे संघटने व कामगार संघटित झाल्यामुळे राज्यातील हजारो कंत्राटी कामगारांना झालेले आहेत व या पुढील काळात देखील सर्वांना लाभ मिळवून देण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.चला तर सभासद होऊ व संघटना बळकट करू.

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वेल्फेअर फंडास माहे जुलै २०२३ मध्ये सढळ हाताने देणगीनिधी दिलेल्या देणगीदार कंत्राटी कामगारांची नावे

- सुधीर जगताप, डेक्कन पुणे निधी शुल्क रुपये ५०१/–
- शिवाजी राऊत, डेक्कन पुणे निधी शुल्क रुपये ५०१/–
- वैभव कामठे, कोथरूड पुणे निधी शुल्क रुपये ५०१/–

# कामगारांचे भविष्य निर्वाह निधी अधिक्षक अभियंता महावितरण कोल्हापूर यांच्या कडून वसुल करून कामगारांना द्यावेत : कोल्हापूर पी एफ कमिशनर यांचा आदेश

महावितरण कोल्हापूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांचे कंत्राटं प्रवीण इलेक्ट्रिकल या कंत्राटदाराणे घेतले होते. त्यावेळी कामगारांच्या वेतना मधुन दरमहा पी एफ ची रक्कम वजावट करून खात्यात भरण्यात आली नव्हती. तेव्हा महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचा पदाधिकारी यांनी भविष्य निर्वाह निधी कार्यालय कोल्हापूर कडे वारंवार पाठपुरावा केला व कलम ७ अ अंतर्गत चौकशी लावून पी एफ ची रक्कम ९, २४ , ७१३ रूपये ची सन २०१५ पर्यंतची मुळ रक्कम निश्चीत केली. व सदरील रक्कम जमा करण्या साठी पी एफ कमिशनर कार्यालय, महावितरण कार्यालय कोल्हापूर येथे वारंवार संघटनेने पाठपुरावा केला. या काळात कंत्राटदार पी एफ रक्कम जमा न करता पळून गेला होता.

या बाबतीत संघटनेने भविष्य निर्वाह निधी कार्यालय च्या वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून ही रक्कम अधीक्षक अभियंता महावितरण कोल्हापूर यांच्या कडून वसुल करून कामगारांना देण्यात यावी अशी भुमिका घेतली होती.या बाबतीत भविष्य निर्वाह निधी कार्यालय येथे कोल्हापूर यांनी अधीक्षक अभियंता महावितरण कोल्हापूर यांनी ही रक्कम त्वरित भरण्यासाठी दि १२/०६/२०२३ रोजी मा श्री के चक्रपाणि सहाय्यक आयुक्त, वसुली आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालय कोल्हापूर यांनी आदेश दिला आहे. या मुळे पुढील काळात कंत्राटदार , प्रशासन बोध घेतील अशी अपेक्षा कामगारांनी व्यक्त केली आहे. या बाबतीत महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे कार्याध्यक्ष अमर लोहार, राहूल भालबर, प्रेम सागर देसाई, मिलिंद कुरतडकर, विजय कांबळे व कोल्हापूर कार्यकारिणी ने अथक प्रयत्न केले.




अप्पर कामगार आयुक्त,शक्ती चेंबर,संगमवाडी,पुणे येथे सातारा येथील ०६ अन्याग्रस्त वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते.

# महाराष्ट्रातील लोकप्रतिनीधींना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवेदने सादर..















